औरंगाबाद प्रतिबिंब
सकाळ
औरंगाबाद, शनिवार,
९ सप्टेंबर २००६
३




आझादअली शाह शिक्षण संस्थेतर्फे मिटमिटा येथे बालकामगार शाळेच्या उद्‌घाटनप्रसंगी माजी विभागीय आयुक्त कृष्णा भोगे, मधुकरअण्णा मुळे, आर. पी. भेगाडे, सुरैया खान, सय्यद अमजद, पॅट्रिक मार्टीन, अवतारसिंह रंधवा, साजीद पाशा आदी.

# आझादअली शाह संस्थेच्या बालकामगार शाळेचे उद्‌घाटन

औरंगाबाद, ता.८ : येथील आझादअली शाह शिक्षण संस्थेतर्फे 'इंड्स' प्रकल्पाअंतर्गत बालकामगारांसाठीच्या शाळेचे उद्‌घाटन मिटमिटा येथे महाराष्ट्र राज्य मानव विकास आयोगाचे अध्यक्ष कृष्णा भोगे यांच्या हस्ते शनिवारी (ता. दोन) झाले.

अध्यक्षस्थानी मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव मधुकरअण्णा मुळे होते; तर प्रमुख पाहुणे म्हणून छावणी कॅन्टोन्मेंट बोर्डाचे मुख्य कार्यकारी अधिकारी आर. पी. भेगाडे, नगरसेवक तरविंदरसिंग धिल्लन, अवतारसिंग रंधवा, संजय तुरे पाटील, 'इंड्स'चे प्रकल्प संचालक पॅट्रिक मार्टीन, आझाद शिक्षण संस्थेच्या अध्यक्ष सुरैया खान आणि प्रशासकीय अधिकारी साजिद पाशा उपस्थित होते.या प्रसंगी श्री. भोगे, श्री. मुळे, श्री. धिल्लन; तसेच श्री. भेगाडे यांनी मार्गदर्शन केले. मंजूषा कुंदलवाड हिने परिचय करून दिला. नाझनीन शेख यांनी प्रास्ताविक केले. साजिद पाशा यांनी संस्थेविषयी माहिती दिली. भाऊसाहेब जाधव यांनी सूत्रसंचालन केले, तर देवीदास जगताप यांनी आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी सय्यद अमजद, अस्मा शेख, सय्यद हलीमुन्निसा, परवीन पठाण, छाया देहरे, सुनीता घोडके यांनी प्रयत्न केले.